# आकाशवाणी पुणे
# प्रादेशिक वृत्त विभाग
# पुणे वृत्तांत
## वेळ - संध्याकाळी 06.00 वा.

**दिनांक- 05.11.2024** **वार – मंगळवार**

---

**प्रचार**

पुणे शहर जिल्ह्यात आणि लढतीचं चित्र स्पष्ट झालं असून प्रचाराला वेग आलं आहे. विकासकामांच्या जोरावर मोठा विजय मिळवू असा विश्वास महायुतीच्या पर्वती विधानसभा मतदारसंघातील उमेदवार माधुरी मिसाळ यांनी व्यक्त केला. आपल्या प्रचारादरम्यान त्या आज पदयात्रेत त्या बोलत होत्या.

तर सिद्धार्थ शिरोळे यांना विक्रमी मताधिक्याने निवडून आणण्यासाठी प्रचाराची सर्वसमावेशक रणनीती आखण्यात आली असून, पुढचे पंधरा दिवस मतदारसंघ पिंजून काढणार असल्याचे भाजपाचे शिवाजीनगर विधानसभा मतदारसंघ प्रचारप्रमुख दत्ता खाडे यांनी सांगितले.

यंदाच्या विधानसभा निवडणुकीत आमचे मत बाबासाहेबांच्या विचारांना आहे. सन्मानपूर्वक वागणूक न देणाऱ्या महायुतीला मतदान करणार नाही, असा निर्धार पुणे शहरातील आरपीआय आठवले पक्षाच्यावतीने करण्यात आलेला आहे.
वडगाव शेरी विधानसभा मतदार संघात राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्षाचे बापूसाहेब पठारे आणि राष्ट्रवादी कॉंग्रेस पक्षाचे सुनील टिंगरे यांच्यात मुख्य लढत असणार आहे. या परिसरात पठारे यांची प्रचाराची दिंडी पाहायला मिळाली. अनेक जण वारकऱ्यांच्या वेशात या दिंडीत सहभागी झाली होते.

**साहाय्यकारी मतदान केंद्र**

विधानसभा सार्वत्रिक निवडणुकीच्या अनुषंगाने पुणे जिल्ह्यातील ८ मतदारसंघात ३५ नवीन साहाय्यकारी मतदान केंद्र आणि १० विधानसभा मतदारसंघात ५३ मतदान केंद्राच्या नावात तर २९ मतदान केंद्राच्या जागेत बदल करण्यात आल्याची माहिती उपजिल्हा निवडणूक अधिकारी मिनल कळसकर यांनी दिली आहे. आंबेगाव विधानसभा मतदारसंघात मतदान केंद्रांची संख्या ३४६ इतकी झाली आहे. तर शिरूर विधानसभा मतदारसंघातील ४५७ केंद्रांमधील १९ मतदान केंद्रांच्या नावात बदल करण्यात आला आहे. दौंड विधानसभा मतदारसंघात ३१३ मतदान केंद्र , पुरंदर विधानसभा मतदारसंघात ४१८ , चिंचवड विधानसभा मतदारसंघात ५६४ , भोसरी विधानसभा मतदारसंघात एकूण ४९२ , वडगावशेरीमध्ये ४४८ , खडकवासला विधानसभा मतदारसंघामध्ये मतदान केंद्रांची संख्या ५०७ झाली आहे. तर ८ मतदान केंद्रांच्या नावात आणि २७ मतदान केंद्रांच्या जागेमध्ये बदल करण्यात आला आहे. हडपसर विधानसभा मतदारसंघात आता ५३२ मतदान केंद्रे असणार आहेत. बारामती विधानसभा मतदारसंघातील ३८६ मतदार केंद्रातील २ मतदान केंद्राच्या जागेत बदल करण्यात आला आहे अशी माहितीही निवडणूक प्रशासनाकडून देण्यात आली आहे.

**गृहनिर्माणसंस्था**

पिंपरी, भोसरी आणि चिंचवड मतदारसंघातील गृहनिर्माण सोसायट्यांमधील मतदान केंद्रांवर १०० टक्के मतदानाचा अधिकार बाजवण्याच्या अनुषंगाने महानगरपालिका, सोसायटी फेडरेशन आणि पिंपरी चिंचवड गृहनिर्माण संस्थाच्या समन्वय बैठकीत

निर्धार करण्यात आला. मतदार जनजागृती अभियानाअंतर्गत आवश्यक असलेले साहित्यदेखील महापालिकेच्यावतीने पुरविण्यात येत, असल्याची माहिती अतिरिक्त आयुक्त विजयकुमार खोराटे यांनी दिली. महापालिकेच्या कार्यक्षेत्रातील १५ मोठ्या गृहनिर्माण संस्थामध्ये २५ मतदान केंद्रे उभारण्यात आले आहेत.

**मिळकतकर**

पुणे शहरातील अनेक मिळकतदारांची थकबाकी कोट्यवधी रुपयांमध्ये आहे. महापालिकेकडून कर वसुली केली जाते. मात्र अनेकदा राजकारण्यांकडून मिळकतकर भरण्याकडे दुर्लक्ष केले जाते. तसेच थकबाकी वसूल न करण्यासाठी राजकीय दबाव टाकला जातो. मात्र आता विधानसभा निवडणुकीचा उमेदवारी अर्ज भरण्यासाठी ना हरकत प्रमाणपत्र मिळण्यासाठी उमेदवारांनी आपली थकबाकी भरल्याची माहिती समोर आली असून पुणे महापालिकेच्या तिजोरीत सुमारे १७ कोटी रुपये मिळकतकर जमा झाला आहे.

**प्रसूतीसंख्या**

पुणे महापालिकेची आणि सरकारी रुग्णालयात असलेली मोफत प्रसूतीची सुविधा यामुळे, खासगीच्या तुलनेत सरकारी दवाखान्यांमध्ये शहरातील महिलांची प्रसूतीची संख्या वाढत आहे. शहरात दरवर्षी ५० ते ५५ हजार प्रसूती होतात. त्यापैकी जवळपास निम्म्या आणि त्याहून जास्त प्रसूती सरकारी दवाखान्यात होतात अशी माहिती पुणे महापालिका आरोग्य विभागाचे माता बाल संगोपन अधिकारी डॉक्टर राजेश दिघे यांनी दिली.

**परिषद**

पुणे विभागाच्या नॅशनल इन्स्टिट्यूट ऑफ पर्सोनेल मॅनेजमेंट आणि एस. बी. पाटील इन्स्टिट्यूट ऑफ मॅनेजमेंटच्या सहकार्याने आज 'स्टुकॉन' ही विद्यार्थी परिषद पार पडली. साज टेस्ट प्लांटच्या कार्यकारी संचालिका ऋतुजा जगताप, वेबॅस्टो इंडिया लिमिटेडचे व्यवस्थापकीय संचालक विकास प्रसाद, यशस्वी ग्रुपचे अध्यक्ष विश्वेश कुलकर्णी आणि सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाचे प्र- कुलगुरू डॉ. पराग काळकर यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

**आग**

मागील तीन वर्षांच्या तुलनेत यंदाच्या दिवाळीत फटाक्यांमुळे पुणे शहरात सर्वाधिक ६० ठिकाणी आग लागण्याच्या घटना घडल्या. या घटनांमध्ये काही ठिकाणी नुकसान झाले. परंतु सुदैवाने कोणी गंभीर जखमी झाले नाही. दिवाळीच्या पार्श्वभूमीवर अग्निशामक दलाकडून 'सुरक्षित दिवाळी, आनंदी दिवाळी' मोहीम राबविण्यात आली.

**हत्ती दागिने**

हत्तीच्या केसांपासून तयार करण्यात आलेले दागिने, तसच अंगठ्यांची विक्री केल्याच्या आरोपावरून विश्रामबाग पोलिसांनी शहरातील एका सराफ व्यावसायिकाविरुद्ध वन्यजीव कायद्यान्वये गुन्हा दाखल केला आहे. त्याच्या दुकानातून जप्त करण्यात आलेले दागिने पडताळणीसाठी वन विभागाच्या पथकाकडे सोपविण्यात आले आहेत.

**हवामान**

पुणे आणि परिसरात आज आकाश मुख्यत: निरभ्र होतं. तर कमाल तापमान 32 तर किमान तापमान 17 पूर्णांक 6 दशांश अंश सेल्सिअस नोंदवलं गेलं.

**हा होता आजचा पुणे वृत्तांत. उद्या पुन्हा भेटू विविधभारती पुणे केंद्रावर, संध्याकाळी सहा वाजता, ताज्या पुणे वृत्तांतमध्ये, नमस्कार.**